# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
## GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL,NAGPUR

क्र.शावैमरुना/सा.भा./इ.कोटे./निर्लेखन सा./ 471 /२०२४ दिः-17/०९/२०२४

प्रति,

..................................
..................................
..................................

विषयः-प्लॉस्टीक कॅन, प्लॉस्टीक पिशव्या व रिकामे खर्डे इत्यादी निर्लेखित साहित्यांची विक्री करुन उचल करण्याचे दरपत्रक्र मागविणेबाबत....

वरील विषयाच्या अनुषंगाने, या संस्थेतील रिकामे खर्डे, प्लॉस्टीक कॅन, प्लॉस्टीक पिशव्या इत्यादी निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री करुन उचल करण्याचे या पत्राव्दारे दरपत्रके मागविण्यात येत आहे. याकरीता इच्छुक असलेल्या अधिकृत दरपत्रक धारकांनी दरपत्रकाच्या लिफाप्यावर या कार्यालयाचे पत्र क्रमांक, दिनांक व निर्लेखित साहित्याचे दरपत्रके असे नमुद करुन लिफाफा सिल बंद करुन मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयर व रुग्णालय, नागपुर या नावे लिहून वैद्यकीय अधिक्षकच्या कार्यालयात सादर करावे. सदर निरुपयोगी साहित्याचे दरपत्रके स्विकारल्या नंतर तुलनात्मक तक्ता मंजुरीच्या दिंनाका पासुन ते एक (१) वर्षाच्या कालावधी करिता वैद्य राहील तसेच दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख दिः-. 23.०९.२०२४ दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील.

१) भाग घेणाऱ्या कंपनीने त्यांच्या फर्मच्या अधिकृत लेटरहेड असलेल्या कागदावर निर्लेखीत केलेल्या वस्तुंची किंमत त्यांच्या रकान्यात प्रति किलो ग्रॅम मध्ये नमुद करुन स्वाक्षरी व शिक्का देऊन सिलबंद लिफाफयात सादर करावी.उशिराने प्राप्त होणारा दरपत्रकाचा व सिलबंद नसलेल्या लिफाफा स्विकारल्या जाणार नाही.

२) दरपत्रके सादर करणाऱ्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र अद्यावत आयकर प्रमाणपत्र, पॅन कार्ड जिएसटी प्रमाणपत्र सादर करावे.

३) निर्लेखीत साहित्याचे प्रमाण कमी किंवा अधिक करण्याची आणि कोणतेही कारण न देता दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शासकाय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर यांची राहील.

४) भाग घेतलेल्या फर्म मधून उच्चतम देयक असणाऱ्या फर्मची निवड करण्यात येईल. प्राप्त झालेल्या दरपत्रके उघविल्या नंतर वाजवी उच्चतम देयक प्राप्त न झाल्यास प्रक्रिया रद्द् करण्याचे अधिकार अधिष्ठातांना राहील.

५) निर्लेखित साहित्यांची स्वखर्चाने उचल करण्याची जबाबदारी यशस्वी फर्मची राहील.

६) योग्य रित्या निर्लेखीत साहित्याची वाहतूक करणे व त्यांची योग्य विल्हेवाट करणे या करिता लागणाऱ्या विविध विभागाच्या ( उदा.वाहतूक पोलीस विभाग, महानगरपालिका इ.) आवश्यक त्यापरवानगी घेण्याची जबाबदारी यशस्वी फर्मची राहील.

७) या संबंधी असलेले सर्व नियमांची पालनकरणे बंधनकारक राहील.

| अ.क्रं | स्क्रॅप मटेरीयलचे नाव | नग-संख्या | प्रती नग/किलो प्रमाणे दर |
|---|---|---|---|
| १ | प्लॉस्टीक कॅन | उपलब्धते प्रमाणे (प्रती नग) | |
| २ | प्लास्टीक पिशव्या | उपलब्धते प्रमाणे (प्रती किलो) | |
| ३ | रिकामे खर्डे | उपलब्धते प्रमाणे (प्रती किलो) | |

अधिष्ठाता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,

नागपुर